| MHLA150005762017 | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | : | २८/०७/२०१७ |
| | नोंदणी दिनांक | : | २८/०७/२०१७ |
| | निकाल दिनांक | : | ०९/०३/२०२६ |
| | कालावधी | : | ०८व. ०७म. १२ दि. |

**भाग– अ**

फॉर्म क्र. XXXII

(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (I))

| | | |
|---|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र.१ चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांचे न्यायालयात** (पिठासीन अधिकारी – व्ही. एस. वाघमोडे यांच्या समोर.) | |
| | **संक्षीप्त फौजदारी खटला क्र. १२४/२०१७** नि.क्र. | |
| फिर्यादी | महा. शासन द्वारा– पोलीस ठाणे चाकूर, ता. चाकूर जि. लातूर | |
| सहा. सरकारी अभियोक्ता | | श्रीमती पी. एस. भराडीया |
| आरोपी | | हरी भास्कर पौळ, वय – २८ वर्ष, धंदा – चालक, रा. करदेहाळी, दक्षीण सोलापूर ता.व जि.सोलापूर |
| आरोपीचे विधीज्ञ | | श्री. जी.एल. कैले |

**भाग – ब**

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | २५/०३/२०१७ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २६/०३/२०१७ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २८/०७/२०१७ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | २६/११/२०२१ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २६/११/२०२१ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०९/०३/२०२६ |
| जर, दोषसिध्दी झाली असेल तर शिक्षा फर्माविण्याचा दिनांक | --- |

## आरोपीचा तपशिल

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा कलम | दोषमुक्ती किंवा दोषसिध्दी | शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | हरी भास्कर पौळ | १३/०४/२०१७ | १३/०४/२०१७ | भा.दं.वि कलम २७९,३३७,३३८ आणि मो.वा.का. कलम १३४/१७७ नुसार. | दोषमुक्त. | - | - |

## भाग 'क'

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (iii))

## अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.

**-अभियोगपक्ष -**

| **अनु.क्र.** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०१ | सलीम मुसा आतार | फिर्यादी |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०२ | बाबा मोमीन मैनोदिन | साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०३ | नाजु मुसा अत्तार | साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०४ | सुभाष नरहारी हरणे | तपासीक अंमलदार |

ब- **-बचावपक्षाचे साक्षीदार -**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | - |

क- **-न्यायालयीन साक्षीदार -**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | - |

अभियोगपक्ष/ बचावपक्ष / न्यायालय, यांचे निशाणी यादी

अ- **-अभियोगपक्ष-**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | नि.क्र. २३ | फिर्याद |
| २. | नि.क्र. ३० | साक्षीदार क्र. २ यांची सही |
| ३. | नि.क्र. ४४ | घटनास्थळ पंचनामा |

ब - **-बचावपक्ष-**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क - -न्यायालयाचे निशाणी क्रमांक -**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड - न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी**

| अनु.क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**इ. -भौतिक वस्तु-**

| अनु.क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**– न्यायनिर्णय –**

(पारीत दि.०९.०३.२०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम २७९,३३७,३३८ आणि मोटार वाहन कायदा कलम १३४/१७७ अन्वये अपराध केले बाबत खटला चालवण्यात आला.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे.

दि.२५.०३.२०१७ रोजी १९.३० वा. मौजे चापोली ते अहमदपूर जाणारे रोडवर शंकर होनराव यांच्या शेताजवळ फिर्यादी त्यांची मोटार सायकल क्र. एम.एच.२४–ए.सी.–७८०४ वर बसून शिरुर ताजबंदकडे जात होते. आरोपीने त्यांच्या ताब्यातील वाहन बस क्र. एम.एच.१४–बी.टी.–५००७ ही हयगयी व निष्काळजीपणे, भरधाव वेगात चालवून फिर्यादीच्या मोटार सायकलला पाठीमागून धडक दिली, त्यामुळे फिर्यादीस गंभीर जखमा झाल्या. घटनेची खबर न देता आरोपी निघून गेले. त्यामुळे फिर्यादीने पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

३. त्या अनुषंगाने चाकूर पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ आणि मोटार वाहन कायदा कलम १३४/१७७ चा गुन्हा गु.र.क्र. ८३/२०१७ अन्वये नोंद झाला. तपासी अधिकारी एस.एन हारणे, पोहेकॉ. पो.स्टे. चाकूर, यांनी सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान घटनास्थळाला भेट देवुन घटनास्थळ पंचनामा व वाहनाचा पहाणी पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, आरोपीस अटक करुन अटकेचा पंचनामा तयार केला. तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. मा. पूर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.क्र.०८ वर आरोपीविरुध्द भा.दं.वि.कलम २७९, ३३७, ३३८ आणि मोटार वाहन कायदा कलम १३४/१७७ नुसार दोषारोपाचा तपशिल नोंदविला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले.

५. नि.क्र.१ वरील दि. २३/१२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. त्यानंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्र.४९ वर नोंदवले. आरोपीने त्यांच्या विरुध्द खोटी केस केल्याचा बचाव घेतला.

६. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.२५.०३.२०१७ रोजी सायंकाळी ०७.३० वा. च्या सुमारास चापोली ते अहमदपूर जाणारे रोडवर शंकर होनराव यांच्या शेताजवळ आरोपीने त्याच्या ताब्यातील बस क्र.एम.एच.१४–बी.टी.–५००७ ही भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे चालवली जेणेकरुन मानवी जिवीतास धोका होईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहचण्याचा संभव असेल व त्याद्वारे भा.द.वि. चे कलम २७९ नुसार गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | ...नाही. |
| २. | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमुद वाहन निष्काळजीपणाने व हयगयीने चालवून फिर्यादीची मोटार सायकल क्र. एम.एच.२४–ए.सी.–७८०४ ला पाठीमागून धडक देऊन फिर्यादीच्या दुखापतीस कारणीभूत झाले व त्याद्वारे भा.द.वि. चे कलम ३३७, अंतर्गत गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | ...नाही. |
| ३. | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमुद वाहन निष्काळजीपणाने व हयगयीने चालवून फिर्यादीची मोटार सायकल क्र. एम.एच.२४–ए.सी.–७८०४ ला पाठीमागून धडक देऊन फिर्यादीच्या गंभीर दुखापतीस कारणीभूत झाले व त्याद्वारे भा.द.वि. चे कलम ३३८, अंतर्गत गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | ...नाही. |
| ४. | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने | |

| मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- |
| त्याचे ताब्यातील वर नमुद वाहन निष्काळजीपणे व हयगयीने चालवून अपघात केला व अपघात झाल्यानंतर जखमींना योग्य तो उपचारास पोहोच न करता वाहन घेऊन पळून गेले, त्याद्वारे मोटार वाहन कायदा कलम १३४/१७७ अंतर्गत गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | ...नाही. |
| ५. आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## का र ण मि मां सा

### मुद्दे क्र. १ ते ४ बाबत –

७. सदरील मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्या कारणाने त्यांचे निष्कर्ष एकत्रीत नोंदवण्याचे ठरवले.

८. साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यात असे आले की, दि.२५.०३.२०१७ रोजी सकाळी ०७.३० वा. लातूर नांदेड हायवेवर तेलगाव पाटीजवळ ते मोटार साकयलवरुन घराकडे जात होते. त्यावेळी निष्काळीजपणे व हयगयीने त्यांच्या मोटार सायकलला मागून धडक दिली होती व त्यांच्या तोंडाला मार लागला होता. सदर बाब अविश्वसनीय आहे असा कोणताही पुरावा साक्षीदार क्र. १ यांच्या उलटतपासातून दिसून आलेला नाही. सदर प्रकरणामध्ये आरोपीतर्फे नि.क्र. ४५ वरील वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य करण्यात आलेला आहे. सदर वैद्यकीय प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता साक्षीदार क्र. १ यांना गंभीर व साध्या स्वरुपाच्या जखमा झाल्याचे दिसून येत आहे. यावरुन साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्याला नि.क्र. ४५ वरील प्रमाणपत्रावरुन दुजोरा मिळत आहे.

९. साक्षीदार क्र.४ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, त्यांनी नि.क्र.४४ नुसार घटनास्थळाचा पंचनामा केला होता. नि.क्र. ४४ चे अवलोकन केले असता त्यामध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, घटनास्थळावर

गुन्हयाच्या उपयुक्त कोणत्याही खाणा खुणा दिसून येत नाहीत. तसेच घटनास्थळावरुन कांहीही जप्त करण्यासारखे मिळून आलेले नाही. यावरुन नि.क्र. ४४ चा पंचनामा हा घटनास्थळी अपघात झाला होता याबाबत कोणताही परिस्थीतीजन्य पुरावा नाही.

१०. साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यात असे आले की, त्यांना बस चालकाचे नाव व बसचा नंबर एम.एच.१४–बी.टी.–५००७ हा त्यांच्या मित्राकडून समजला होता. त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये ही बाब मान्य केली की, घटनेच्या वेळी आजु बाजूला अंधार होता व बसच्या चालकाला त्यांनी प्रत्यक्ष पाहीले नाही. अशा परिस्थीतीमध्ये आरोपीची ओळख व घटनेतील गाडीची ओळख ही ऐकीव पुराव्याच्या आधारे साक्षीदार क्र. १ यांनी कथीत केली आहे. त्यामुळे त्या पुराव्यावर विश्वास ठेवता येणार नाही.

११. साक्षीदार क्र. ३ यांच्यापुराव्यात असे आले की, साक्षीदार क्र. १ हे जेंव्हा घरी आले होते तेंव्हा त्यांच्या तोंडातून रक्त व दात पडल्याचे दिसून आले होते. सदर बाब अविश्वसनिय आहे असा कोणताही पुरावा साक्षीदार क्र. ३ यांच्या उलटतपासातून दिसून येत नाही. साक्षीदार क्र. १ व ३ यांच्या पुराव्यातून ही बाब सिध्द होते की, दि. २५.०३.२०१७ रोजी सायकाळी ०७.३० वा. साक्षीदार क्र. १ यांचा अपघात झाला होता व त्यांना किरकोळ व गंभीर जखमा झाल्या होत्या. परंतू त्या जखमा या आरोपी यांच्या हयगयी व निष्काळजीपणे झाल्या होत्या याबाबत कोणताही प्रत्यक्ष व परिस्थीतीजन्य पुरावा अभियोगपक्षातर्फे सिध्द करण्यात आलेला नाही. तसेच अपघातातील धडक देणारी बस ही एम.एच.१४–बी.टी.–५००७ अशी होती हे सिध्द करण्याकरीता कोणताही प्रत्यक्ष किंवा परिस्थीतीजन्य पुरावा अभियोगपक्षातर्फे सिध्द करण्यात आलेला नाही.

१२. तसेच जरी आरोपीतर्फे जखमेचे प्रमाणपत्र मान्य केले तरी अभियोगपक्षाचे सर्व प्रकरण हे परिस्थीतीजन्य पुराव्यावर अवलंबून आहे. परंतू

कोणताही परिस्थीतीजन्य पुरावा अभियोगपक्षातर्फे सिध्द करण्यात आलेला नाही, जेणे करुन अपघातातील गाडी ही आरोपी हयगयीने व निष्काळजीपणे चालवित होते ही बाब सिध्द होईल. एकंदरीत आरोपीविरुध्द कोणत्याही प्रकारचा पुरावा सादर करण्यास अभियोगपक्ष असफल ठरलेला आहे. त्यामुळे मुद्दे क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येतात.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता</u>** –

१३. मुद्दे क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी आलेले आहेत. घटनेतील वाहन हे जप्त करण्यात आले होते याबाबत कोणतेही कथन नाही तसेच दोषारोपपत्रा मध्ये मुददेमालाचे वर्णन रिक्त ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे अपघातातील गाडीबाबत कोणताही आदेश करण्यात येत नाही. म्हणून खालीप्रमाणे आदेश करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

| | |
|---|---|
| १. | आरोपी हरी भास्कर पौळ, यांना भारतीय दंड संहिता कलम १८६० चे कलम २७९,३३७,३३८ आणि मोटार वाहन कायदा कलम १३४/१७७ च्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीने पुर्वीचे दिलेले वैयक्तिक बंधपत्र व जात मुचलका हे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–ए च्या तरतुदी करीता आव्हान कालावधीपर्यंत कायम करण्यात येत आहे. |
| ३. | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. |

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.03.09 17:53:17 +0530

दिनांक – ०९.०३.२०२६

(व्ही. एस. वाघमोडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | : | M.B. Pathan |
| Name of the Court | : | Civil Judge J.D. & J.M.F.C, Chakur. |
| Date of Order/ Judgment | : | 09/03/2026 |
| Order/Judgment signed by Presiding Officer on | : | 09/03/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 09/03/2026 |